|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

जळगाव -४२५००१ ☎(०२५७) २२५७२१३, २१४

## विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमांकरिता करार पध्दतीने चहा, नाश्ता व भोजन पुरविणेसाठी ई-निविदा सूचना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमांसाठी ऑक्टोंबर, २०१९ ते सप्टेंबर, २०२० या कालावधीकरीता वार्षिक करार पध्दतीने चहा, नाश्ता व भोजन पुरविणेसाठी नोंदणीकृत भोजन पुरवठादारांकडून चहा, नाश्ता व भोजनासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा संबंधी माहिती विद्यापीठ संकेतस्थळ www.nmu.ac.in वर फक्त माहितीसाठी उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर निविदा भरण्यासंबंधी सूचना, अटी व शर्ती https:\\maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तांत्रिक लिफाफा (Technical Bid) परिपूर्ण असल्यावरच दराचा लिफाफा (Price Bid) उघडण्यात येईल.

टिप : १) ई-निविदा डाऊनलोड व सादर करण्याची दि.१८/०९/२०१९ ते दि.०९/१०/२०१९ वेळ संध्या.०५.४० वाजेपर्यंत आहे.
२) तांत्रिक लिफाफा उघडण्याची दि.१२/१०/२०१९ वेळ दु.०२.३० वा.

स्थळ : मुख्य प्रशासकीय इमारत, कबचौउमवि, जळगाव
जा.क्र. : कबचौउमवि/०२/का.व्य.क./ई-निविदा-१/६४/२०१९
दिनांक : १७/०९/२०१९ (भ. भा. पाटील)
ठिकाण : जळगाव कुलसचिव

||अंतरी पेटवू ज्ञानज्योत||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

टेलिफोन नं. (0257) 2257213/214, फॅक्स नं. - (0257) 2258406

कामाचे नाव

# विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमांकरीता चहा, नाश्ता व भोजनाच्या वार्षिक करार पध्दतीसाठी ई-निविदा सूचना

## (वर्ष २०१९-२०)

**कराराचा कालावधी : ऑक्टोबर, २०१९ ते सप्टेंबर, २०२०**

**संदर्भ**:- कबचौउमवि/२/का.व्य.क./ई-निविदा-१/६४/२०१९, दिनांक - १७/०९/२०१९

**संपर्क**

**अधिक माहितीसाठी कृपया https://mahatenders.gov.in आणि www.nmu.ac.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.**

**एकूण पाने 01 ते 20**

निविदा किंमत रु.१५००/-

# ०अनुक्रमणिका०


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1 | ई-निविदेविषयक वेळापत्रक आणि संपर्क तपशिल | 1 |
| 2 | ई-निविदा सुचना जाहिरात | 2 |
| 3 | ई-निविदा भरण्यासंदर्भातील सूचना | 3 ते 5 |
| 4 | ई.निविदेसंबधीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती | 6 ते 9 |
| 5 | प्रपत्र -.1 | 10 |
| 6 | प्रपत्र -.2 | 11 |
| 7 | प्रपत्र -.3 | 12 ते 13 |
| 8 | प्रपत्र -.4 | 14 |
| 9 | प्रपत्र -.5 | 15 |
| 10 | प्रपत्र -.6 | 16 |
| 11 | शिफारस पत्र | 17 |
| 12 | चहा, नाश्ता व भोजनासंबंधी मेनूचा तपशिल | 18 ते 19 |
| 13 | व्यापारी लिफाफा BOQ | 20 |

# ई-निविदा वेळापत्रक आणि संपर्क तपशिल

**(विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमांसाठी चहा, नाश्ता व भोजन ठेका)**

**कालावधी : ऑक्टोंबर, २०१९ ते सप्टेंबर, २०२०**

| अ. क्र. | निविदेसंबंधित प्रमुख तारखा | सुरुवात दिनांक आणि वेळ | अंतिम दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|
| 01 | ई- निविदा प्रसिध्दी | **18/09/2019** | **----** |
| 02 | ई-निविदा कागदपत्रे डाऊनलोडींग /ऑन लाईन सादरीकरण | **18/09/2019** | **09/10/2019 संध्या. 05.40 पर्यंत** |
| 03 | तांत्रिक बीड उघडण्याची  तारीख | **12/10/2019** | **----** |
| 04 | पात्र निविदा धारकांची आर्थिक बीड उघडण्याची तारीख | **15/10/2019 तांत्रिक बीड तपासणीनंतर (शक्य झाल्यास)** | **----** |
| 05 | निविदा कागदपत्रे उघडण्याचे ठिकाण | **क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव मुख्य इमारत** | **----** |
| 06 | पात्र निविदाधारकांना वाटाघाटीसाठी बोलाविण्याची तारीख | **18/10/2019** | **----** |

## ई-निविदा विषयक चौकशीसाठी संपर्क

1) **श्री. सुमीत काटकर (NIC प्रतिनिधी)** : 7745827385, 7843024910
   Online निविदा  सादर करतांना येणाऱ्या अडचणी व अधिक माहितीकरिता

2) **समन्वयक, कार्यक्रम व्यवस्थापन कक्ष** : 0257-2257213 /214
   कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

3) **खरेदी विभाग (वित्त)** : 0257-2257236/237
   कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमांसाठी चहा, नाश्ता व भोजनासंबंधीची ई-निविदा सूचना (वर्ष २०१९-२०)

**कराराचा कालावधी : ऑक्टोंबर, २०१९ ते सप्टेंबर, २०२०**

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

जळगाव -४२५००१ ☎ (०२५७) २२५७२१३, २१४

## विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमांकरिता करार पध्दतीने चहा, नाश्ता व भोजन पुरविणेसाठी ई-निविदा सूचना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमांसाठी ऑक्टोंबर, २०१९ ते सप्टेंबर, २०२० या कालावधीकरीता वार्षिक करार पध्दतीने चहा, नाश्ता व भोजन पुरविणेसाठी नोंदणीकृत भोजन पुरवठादारांकडून चहा, नाश्ता व भोजनासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा संबंधी माहिती विद्यापीठ संकेतस्थळ www.nmu.ac.in वर फक्त माहितीसाठी उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर निविदा भरण्यासंबंधी सूचना, अटी व शर्ती https:\maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तांत्रिक लिफाफा (Technical Bid) परिपूर्ण असल्यावरच दराचा लिफाफा (Price Bid) उघडण्यात येईल.

टिप : १) ई-निविदा डाऊनलोड व सादर करण्याची दि.१८/०९/२०१९ ते दि.०९/१०/२०१९ वेळ संध्या.०५.४० वाजेपर्यंत आहे.

२) तांत्रिक लिफाफा उघडण्याची दि.१२/१०/२०१९ वेळ दु.०२.३० वा.

स्थळ : मुख्य प्रशासकीय इमारत, कबचौउमवि, जळगाव

जा.क्र. : कबचौउमवि/०२/का.व्य.क./ई-निविदा-१/६४/२०१९

दिनांक : १७/०९/२०१९

ठिकाण : जळगाव

(भ. भा. पाटील)

कुलसचिव

# ई-निविदा भरण्यासंदर्भातील सूचना

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक प्रशाळा/विभाग व प्रशासकीय विभागांतर्फे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कार्यशाळा, चर्चासत्र, परिषदा तसेच प्रशिक्षण, विविध स्पर्धांचे व बैठकांचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमांसाठी उपस्थित राहणाऱ्या सहभागींसाठी चहा, नाश्ता व भोजनाची व्यवस्था कार्यक्रम व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येत असते.

त्याअनुषंगाने **ऑक्टोंबर, 2019 ते सप्टेंबर, 2020** या दरम्यान विविध प्रशासकीय विभाग व शैक्षणिक प्रशाळा/विभागांतर्फे विविध प्रकारच्या कार्यक्रमांसाठी **एका वेळेस किमान ९० व कमाल २५०० व्यक्तींकरिता (आवश्यकते प्रमाणे)** चहा, नाश्ता व भोजन व्यवस्थेसाठी नोंदणीकृत विविध भोजन पुरवठादारांकडून ई निविदा प्रक्रीयेव्दारे निविदा मागविण्यात येते आहेत. ई-निविदा भरण्यासंदर्भातील सूचना खालीलप्रमाणे :

१. को-या निविदा, अटी व शर्तीसह महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या ई-निविदा पोर्टलवर व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहेत. भरलेली ई-निविदा मात्र महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in ह्या ई-निविदा पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या (upload) आहेत.

२. सर्व पात्र/इच्छुक निविदाधारकांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या www.mahatenders.gov.in. या पोर्टलवर नोंदणी (enroll) करणे आवश्यक आहे.

३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवजे फक्त ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल. तसेच निविदा किंमत व बयाणा रक्कम ऑनलाईनच भरावी लागेल. अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

४. ई-निविदेमध्ये नमूद केलेल्या पात्रतेच्या निकषानुसार सर्व कागदपत्रे ई-निविदा लिफाफा क्र.१ मध्ये (तांत्रिक निविदा) अपलोड करणे अनिवार्य आहे. त्याशिवाय वित्तीय दरांच्या ई-निविदा (Price Bid) उघडण्यात येणार नाही.

५. ज्या निविदाकारांना निविदा किंमत व बयाणा रक्कम शासन निर्णयानुसार भरण्यासंदर्भात सुट असेल, त्यांनी निविदा किंमत व बयाणा भरणे आवश्यक नाही. तथापि, त्यांनी तांत्रिक निविदेसोबत (लिफाफा क्र.१) सदरचा शासन निर्णयाची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

६. इतर सुचना, बयाणा रक्कम, चहा, नाश्ता व भोजन ठेका अंदाजित किंमत याबाबतची माहिती, अटी शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर निविदा मंजुर करणे, त्यामधील अटी व शर्तीमध्ये वाढ करणे किंवा शिथील करणे, निविदा उघडण्याच्या दिनांक पुढे ढकलणे तसेच निविदा प्रक्रियेत बदल करणे अथवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करणे व इतर बाबतचे संपुर्ण हक्क व निर्णय कुलसचिवांनी राखुन ठेवले आहेत.

७. इंटरनेट, विद्युतपुरवठा किंवा संगणक बिघाड इत्यादी कारणांमुळे निविदा सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी कुलसचिव यांची राहणार नाही. ईमेल, फॅक्स, हस्तपोच इत्यादी द्वारे सादर केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

८. पात्र ठेकेदारांना दरांबाबत वाटाघाटीसाठी बोलाविण्यात येईल त्याचवेळेस निविदेसोबत अपलोड केलेल्या कागदपत्रांची तपासणी मुळ कागदपत्रांवरुन करण्यात येईल. त्यासाठी निविदाधारकांनी अशा वेळी मूळ कागदपत्रे सोबत ठेवावीत. तांत्रिक व व्यापारी लिफाफा वेळापत्रकानुसार शक्य झाल्यास त्याच दिवशी कुलसचिव यांचे दालनात उघडण्यात येतील किंवा यात बदल झाल्यास तसे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**९. दरांबाबत केलेल्या वाटाघाटीअंती सारख्या दरांचे किमान तीन निविदाधारक निश्चित करण्यात येतील व त्यांना अध्यक्ष, संनियंत्रण समिती, कार्यक्रम व्यवस्थापन कक्ष यांच्या आदेशान्वये व आवश्यकतेनुसार आळीपाळीने (Rotation) कामाचे कार्यादेश देण्यात येतील.**

१०. सदरच्या ई-निविदेस सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात प्रसिध्दी देण्यात येत असुन, जर तीन ग्राह्य तांत्रिक लिफाफे/ई-निविदा प्राप्त न झाल्यास पुन्हा निविदेस मुदतवाढ देण्यात येईल. प्राप्त निविदा संपूर्ण अथवा अंशत: नाकारणे किंवा पुन्हा मागविणे याबाबतचे सर्व अधिकार कुलसचिव यांनी राखुन ठेवले आहेत.

११. काही अपरिहार्य कारणामुळे वरील ठिकाण वेळेत व दिनांकास निविदा उघडणे शक्य नसल्यास आणि निविदा प्रक्रिये बाबत होणा-या बदलाचा तपशील अगर तशी सूचना (शुध्दीपत्रक) या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत निविदाधारकां सोबत स्वतंत्र पत्रव्यव्यहार करण्यात येणार नाही व सर्व बदल निविदाधारकांवर बंधकारक राहतील.

१२. चहा, नाश्ता व भोजनाबाबतचा तपशिल निविदा फार्म मध्ये नमूद करण्यात आला आहे.

१३. ई निविदा उघडतांना प्रथम लिफाफा क्र. १ (तांत्रिक) उघडून त्यामध्ये आवश्यक कागदपत्रांची व अटी-शर्तीची पुर्तता केली असल्याची खातरजमा करण्यात येईल. त्यामध्ये त्रुटी आढळल्यास निविदाधारकाने दिलेला लिफाफा क्र.२ (दरपत्रक) उघडण्यात येणार नाही व त्यांची निविदा रद्द करण्यात येईल. तांत्रिक निविदे बाबत निविदाकारास व्यापारी लिफाफा उघडण्यापूर्वी आक्षेप या कार्यालयास नोंदविता येतील. मात्र व्यापारी लिफाफा उघडण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तांत्रिक लिफाफ्याच्या बाबतीत कोणताही आक्षेप नोंदविता येणार नाही आणि मुदती अंती आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाही.

१४. निविदेच्या नमुन्यात मागविलेली सर्व कागदपत्रे निविदेसोबत जोडणे (स्कॅन करणे) आवश्यक आहेत. तसेच सदरची कागदपत्रे मुळ प्रतीत किंवा स्वाक्षांकित केलेले असणे आवश्यक आहेत.

१५. सदर ई-निविदा ही तांत्रिक कारणामुळे किंवा इतर प्रशासकीय कारणास्तव कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे अधिकार कुलसचिव यांनी राखुन ठेवला आहे.

१६. निविदाधारकाने निविदा प्रक्रियेतुन कोणत्याही टप्प्यावर माघार घेतल्यास त्याची निविदा शुल्कासह बयाना रक्कम जमा करुन त्यांना काळ्या यादीत टाकण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

१७. शासन निर्णय, उद्योग, अर्जा व कामगार दि. १ डिसेंबर २०१६ मधील तरतूद ४.४.१.१ अन्वये निविदाधारकाशी संबंधित जोखमीच्या स्वरुपात बयाणा रक्कम वापरण्यात येते. निविदाधारकाकडून निविदा प्रस्ताव मागे घेणे, प्रस्तावात फेरफार करणे, करारावर सही न करणे, प्रस्ताव स्वीकृतीनंतर सुरक्षा अनामत न भरणे, अन्य अटींची पूर्तता न करणे अशा जोखमीच्या बाबतीत पूर्तता न झाल्यास बयाणा रक्कम जप्त करण्याचे अधिकार मा.कुलसचिव यांना राहतील.

१८. निविदाधारक फर्म/बचत गट/ सहकारी संस्थेच्या कार्यकाळ नोंदणी दिनांकापासून निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यत किमान ६ (सहा) महिन्यांचा असावा. निविदाधारक फर्म/बचत गट/ सहकारी संस्था असल्यास व कार्यकाळ २ वर्षापेक्षा जास्त असल्यास बचत गट/संस्थेची नोंदणी झाल्यापासून निविदा सादर करण्याच्या कालावधीपर्यंत मान्यताप्राप्त सनदी लेखापाल(C.A) यांचेद्वारा प्रमाणित मागील तीन (०३) आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण अहवाल व ताळेबंद अहवाल (Audited Statements) किंवा २ वर्षापेक्षा

कमी कार्यकाळ असल्यास लागू असलेल्या आर्थिक वर्षातील लेखा परिक्षण अहवाल व प्रमाणित ताळेबंद अहवाल निविदेसोबत सादर करणे (Upload) अनिवार्य आहे.

१९. उपरोक्त अटी व शर्तीबाबत काही अडचणी असल्यास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दूरध्वनी क्रमांकावर किंवा प्रत्यक्ष संपर्क साधून अडचणींचे निवारण करुन घेता येईल. निविदा कार्यवाहीस्तव या कार्यालयाकडून ऑनलाईन सूचना प्रसिध्दीअन्वये बैठक, सभा बोलवण्यात आल्यास सदर बैठकीस किंवा निविदा उघडतेवेळी फक्त निविदाधारक त्यांचेद्धारा प्राधिकृत (संस्थचे प्राधिकार पत्र व ओळखपत्रासह हजर असलेले) प्रतिनिधी यांनाच उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाईल.

२०. सदर कामाचे स्वरुप, निविदा अटी शर्ती इत्यादीची माहिती निविदा पत्रकात उपलब्ध आहे. परिपूर्ण भरलेल्या निविदा, निविदा सूचनेत दिलेल्या निर्देशानुसार सादर करण्यात याव्यात. निविदेसंबंधित मुदतवाढ, दुरुस्ती किंवा सूचीमधील बदल इत्यादी बाबी वृत्तपत्रात जाहीर केल्या जाणार नसून त्याबाबतची माहिती उपरोल्लेखित विद्यापीठाच्या संकेतस्थळावरच प्रसिध्द करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

२१. अ) निविदेच्या प्रत्येक पानावर निविदाधारकाचे निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संमतीदर्शक संपूर्ण सही व शिक्का असणे आवश्यक आहे. कुठल्याही प्रकारची खाडाखोड, ओव्हर रायटींग आढळल्यास निविदा अपात्र समजण्यात येईल.

ब) निविदे सोबत अधिकृत साक्षांकित दस्तऐवजांच्या प्रती जोडाव्यात, अपूर्ण दस्तऐवज असलेली निविदा नाकारली जावु शकेल.

क) निविदेत नमूद केलेल्या दस्ताऐवजां व्यतिरिक्त इतर काही दस्तऐवज मागणी केल्यास ते देखील सादर करणे निविदा धारकावर बंधनकारक राहील.

फ) जी व्यक्ती अज्ञान आहे किंवा जी व्यक्ती दिवाळखोर म्हणून जाहीर झालेली आहे. किंवा भारतीय दंड विधान कायद्याअंतर्गत एखाद्या गुन्ह्यात न्यायालयाने दोषी जाहीर केलेली असेल किंवा अशा प्रकारच्या गुन्ह्यामध्ये ती व्यक्ती नैतीक मुल्य भ्रष्ट करण्याकामी समाविष्ट असेल किंवा जी व्यक्ती गुन्हेगारी स्वरूपाच्या कामात समाविष्ट असेल किंवा काही काळा पुरती प्रतिबंधक कायद्याखाली स्थानबध्द केलेली असेल किंवा केंद्र शासन, राज्य शासन, किंवा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांनी त्या व्यक्तीस/संस्थेस काळ्या यादीत टाकलेले असेल अशी व्यक्ती/संस्था निविदा भरण्यास अपात्र समजण्यात यावी. अशा व्यक्तीने अथवा संस्थेने जर निविदा सादर केली तर ती रद्द समजण्यात येईल.

ह) प्रत्येक पानावर निविदा धारकाद्धारा स्वाक्षरीकृत निविदा विषयक दस्तऐवजांचा पूर्ण संच ठेकेदाराने अपलोड करणे आवश्यक राहील.

**कुलसचिव**
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# ई-निविदा संबंधीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे आयोजित विविध कार्यक्रमांकरिता चहा, नाश्ता व भोजनासाठी **एका वेळेस किमान ९० व कमाल २५०० व्यक्तींकरिता (आवश्यकते प्रमाणे)** ऑनलाईन पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

२. **<u>बयाणा रक्कम व निविदा किंमत</u> : ठेकेदाराने ई निविदा भरतांना निविदा किंमत रु.१,५००/- (अक्षरी एक हजार पाचशे मात्र) व बयाणा रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) ऑनलाईन (Net Banking) व्दारे भरावयाची आहे.** निविदेसोबत सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेल्या परवान्याची साक्षांकीत केलेली सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने त्यास ओळखणाऱ्या दोन व्यक्तींचे हमीपत्र निविदे सोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे जोडावे.

३. निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर निविदाधारकास बयाणा रक्कम परत करण्यात येईल अशी रक्कम परत करण्यास उशीर झाल्यास निविदाधारकास कोणत्याही प्रकारचे व्याज मागण्याचा अधिकार राहणार नाही.

४. **ज्या ठेकेदाराची निविदा स्विकृत केली जाईल. त्यास कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर ०७ (सात) दिवसांच्या आत सुरक्षा अनामत रक्कम रु २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) जमा करावी लागेल. कराराचा कालावधी संपल्यानंतर सुरक्षा रक्कम (बिनाव्याजी) परत दिली जाईल.**

५. **निविदा स्विकृत केलेल्या ठेकेदारास अटी व शर्तीचा करारनामा नियमानुसार देय असलेल्या कोर्ट फी स्टँम्पवर करुन द्यावा लागेल.**

६. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये ज्या दिवसापासून चहा, नाश्ता व भोजन पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील त्या दिवसापासून ते पुढील वर्षाच्या चहा, नाश्ता व भोजन ठेका मंजूर होईपर्यंत किंवा निविदा प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत प्रशासकीय गरजे प्रमाणे भोजन पुरवठा करावा लागेल.

७. ठेकेदाराला काही कारणास्तव नेमून दिलेल्या करार कालावधीच्या आत ठेका रद्द अथवा बंद करावयाचा असल्यास त्यासंबंधी ठेका रद्द करण्याच्या तारखेपूर्वी **३० (तीस)** दिवस अगोदर लेखीपत्राद्वारे सबळ कारणासह मा.कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांना कळविणे आवश्यक राहील. तसे न केल्यास नमूद अटी व शर्तीनुसार त्यांची संपूर्ण सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

८. ठेका दुसऱ्यास हस्तांतरीत करता येणार नाही अथवा पोट-ठेकेदार नेमता येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९. ठेकेदाराची आणि नोकरवर्गाची वागणूक सहकार्याची आणि सौजन्यपूर्ण असली पाहिजे.

१०. काम करतांना एखाद्या कामगारास इजा किंवा दुखापत झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ही ठेकेदाराची राहील.

११. कार्यक्रमाच्यावेळी इमारतीचे व फर्निचरचे तसेच कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास नुकसान हे संबंधीत ठेकेदाराकडून वसूल केले जाईल.

१२. कार्यक्रमाच्यावेळी भोजनाच्या ठिकाणी व्यवस्थापन परिषद सदस्य तसेच विद्यापीठातील सर्वोच्च अधिकारी केव्हाही भेट देतील व खाद्य पदार्थांची प्रतवारी तपासतील. खाद्य पदार्थाची प्रतवारी कमी दर्जाची असल्यास कंत्राट रद्द करण्याचा सर्व अधिकार कुलसचिव यांना राहतील.

१३. ठेकेदाराने त्याच्या सर्व कर्मचा-यांच्या बाबतीत तसेच ठेका बाबत संपूर्ण कामगार कायदे, स्थायी आदेशांचे वेळोवेळी पालन करणे बंधनकारक राहील. त्याबाबतचे कागदपत्रे त्यांनी दरमहा किमान एकदा वित्त व लेखा अधिकारी किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांना दाखविणे आवश्यक राहील.

१४. ठेकेदारांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी कोणाशीही वादविवाद न करता संबंधितांबाबत तक्रार असल्यास कार्यक्रम व्यवस्थापन कार्यालयात त्वरीत संपर्क करावा.

१५. पोलीस अधिक्षक यांचेकडील चारीत्र्य पडताळणी दाखला या टेंडर सोबत जोडणे आवश्यक राहील.

१६. कार्यक्रमामध्ये चहा, नाश्ता किंवा जेवण करीत असतांना जर ताटामध्ये काही अनपेक्षीतपणे किडे,अळी, झुरळ इ. निघाले आणि त्याबाबतची तक्रार संबंधितांनी केली तर याबाबत चौकशी केल्यानंतर त्वरीत मा. कुलसचिव यांना अहवाल सादर करावा. नंतर मा. कुलसचिव हे चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करतील गरज भासल्यास महाराष्ट्र शासनाचे, अन्न व औषध विभागातीलअधिकारी यांचेशी संपर्क करुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१७. वरील पैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास त्या संदर्भात ठेकेदाराचे म्हणणे ऐकूण घेवून सदर ठेका रद्द करण्याचा सर्व अधिकार मा. कुलसचिव यांना राहतील.

१८. कार्यक्रमात उरलेले अन्न, खरकटे आणि इतर अनावश्यक वाया जाणारे पदार्थांची विद्यापीठातील मुलांच्या वसतिगृहातील जैविक कचरा मशिनमध्ये विल्हेवाट लावणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

१९. कार्यक्रमाच्या आजुबाजूचा परिसर तसेच विद्यापीठातील परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. अस्वच्छता आढळून आल्यास कारवाई करुन दंड आकारण्यात येईल.

२०. स्वयंपाकाकरीता लागणारी भांडी तसेच या व्यतिरिक्त इतर साहित्य (गॅस यंत्रणा इ.) आणि नोकर वर्ग यांची व्यवस्था भोजन पुरवठादारांनी स्वतः करावी पुरवठादारास कोणत्याही इमारतीचा वापर करता येणार नाही. (उदा.स्वयंपाक करणा-या कर्मचा-यांची निवासाची व्यवस्था) पुरवठादाराच्या कोणत्याही वैयक्तिक अटी शर्ती असलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही तसेच भोजन पुरवितांना स्वयंपाकासाठी निरोगी कर्मचारी नेमावे लागतील व स्वच्छतेची काळजी घ्यावी लागेल. चहा, नाश्ता व भोजन तयार करणाऱ्या, वितरीत करणाऱ्या आणि त्या कामी मदत करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराचीच राहिल. या बाबत विद्यापीठाचे कोणतेही उत्तरदायित्व राहणार नाही. तसेच विविध कार्यक्रमांसाठी चहा, नाश्ता व भोजन तयार करण्याकरीता घरगुती गॅस सिलेंडर्सचा वापर न करता सर्व निविदाधारकांनी व्यावसायिक गॅस सिलेंडर्सचाच वापर करावा व बाल कामगार नेमता येणार नाहीत.

२१. ठेकेदाराने वेळेवर चहा, नाश्ता व भोजनाचा पुरवठा न केल्यास अशा प्रसंगासाठी ठेकेदारास रुपये १०००/- प्रति दिवस दंड आकारण्यात येईल. तसेच चहा, नाश्ता व भोजनाची पर्यायी व्यवस्था केल्यास त्यासाठी मंजुर दरापेक्षा लागणारा जादा खर्च ठेकेदारांकडून वसुल करण्यात येईल.

२२. निविदाधारकास चहा, नाश्ता व भोजन ठेका मंजुर झाल्यास त्यांनी चांगल्या प्रतिचे चहा, नास्ता व भोजन देणे बंधनकारक राहील. परंतु चहा, नाश्ता व भोजनातुन विषबाधा सारखे काही प्रकार घडल्यास त्यांच्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. व त्यांची सर्वस्वी जबाबदारी पुरवठाधरकांची राहील.

२३. विद्यापीठाचे हित लक्षात घेऊन सदर निविदेतील एखादी किंवा अधिक अटी शिथिल करण्याचा व अर्थ लावण्याचा तसेच कोणतीही निविदा पुर्णतः अथवा अंशतः मंजुर करण्याचा तसेच एखादी अगर सर्व निविदा कोणतेही कारण न दर्शविता नाकारण्याचा संपुर्ण अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

२४. ठेकेदाराने भोजनठेका अचानक बंद केल्यास, वारंवार चहा, नाश्ता व भोजन नियमित व वेळेवर न पुरविल्यास तसेच निकृष्ठ दर्जाचे चहा, नाश्ता व भोजन दिल्यास त्यांचा भोजन ठेका रद्द करुन सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच त्यांची नावे विद्यापीठाच्या काळया यादीत टाकण्यात येईल.

२५. कोणत्याही परिस्थितीत मंजुर दरामध्ये वाढ केली जाणार नाही. तसेच निविदेच्या दराबाबतआवश्यकता वाटल्यास वाटाघाटी करण्याचा अधिकार संनियंत्रण समितीस राहिल.

२६. कार्यक्रमासाठी वापरण्यात येणाऱ्या गॅस यंत्रणेच्या सुरक्षितेची संपुर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच स्वयंपाकाच्या ठिकाणी दुर्घटना घडल्यास होणाऱ्या संभाव्य नुकसानाची जबाबदारी सुध्दा ठेकेदाराची राहील.

२७. करारनामा करतांना वाढीव अटी व शर्तीचा अंतर्भाव करण्याचा अधिकार मा.कुलसचिव यांनी राखून ठेवला आहे.

२८. चहा, नाश्ता व भोजन पुरवठयाकामी वापरण्यात येणारे दूध, अन्नधान्य-किराणा माल, भाजीपाला, तसेच तयार केलेले अन्नपदार्थ यांचे दर्जाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास अन्न व औषध प्रशासन विभागाकडून मालाचा दर्जा तपासण्यात येईल. भोजन पदार्थ तपासणीचा सर्व खर्च नियमानूसार पुरवठाधारक यांनी करणे बंधनकारक राहील. त्याअन्वये भोजन पदार्थाचे दर्जाबाबत तपासणीअंती तक्रारीबाबत तथ्य आढळून आल्यास संबंधीतावर प्रचलित कायद्यातील तरतूदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल व पुरवठा आदेश तत्काळ रद्द करुन काळया यादीत समावेश करण्यात येईल.

२९. चहा, नाश्ता व भोजनपुरवठा कालावधीत पुरवठा करण्यात आलेल्या चहा, नाश्ता व भोजनातून शिळे, निकृष्ट किंवा भेसळजन्य, अपायकारक अन्नपदार्थांचे सेवन केल्याने, भोजनव्यवसथेतील अस्वच्छता वा इतर बाबतीत निष्काळजीपणामुळे विषबाधा किंवा कोणत्याही प्रकारचा शारीरिक त्रास झाल्यास संबंधीत भोजन ठेका धारकास जबाबदार धरण्यात येऊन त्यांच्यावर नियमानुसार दंडात्मक अगर फौजदारीपात्र कायदेशीर कारवाई प्रस्तावित केली जाईल, अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ अंतर्गत नियम व नियमन २०११ नुसार अन्न सुरक्षा व्यवस्थापन व त्याअंतर्गत उत्तम आचरण प्रणाली यासंदर्भात अन्न व औषध प्रशासन, म.राज्य,जळगाव यांचेकडून पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करुन इकडील कार्यालयास (कार्यादेश स्वीकृतीनंतरएका महिन्याच्या आत) सादर करण्याची जबाबदारी मंजूर पुरवठा धारकांची राहील. सर्व खर्च पुरवठाधारक यांनी करणे बंधनकारक आहे.

३०. मंजूर पुरवठाधारकानेच व संस्था /बचत गट असल्यास अध्यक्ष-सचिव तथा अधिकृत सभासदांनीच चहा, नाश्ता व भोजन ठेका चालविण्यासाठी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. शासनाच्या धोरणान्वये महिला सक्षमीकरण, सहकार चळवळ वृध्दींगत करणे या उद्देशाने महिला बचत गट व सहकारी संस्थांच्या माध्यमातून व्यवसायास उयुक्त करण्यात येत आसल्याने बचत गट/संस्थेच्या अधिकृत सदस्यांनी कार्यकुशलता दर्शवून स्वत:भोजन ठेका चालविणे अभिप्रेत आहे. त्यामुळे मंजूर पुरवठाधारक व्यक्ती/ संस्थेचे -बचत गटाचे सदस्य हे स्वतः उपस्थित न राहता त्यांनी अन्य दुय्यम यंत्रणा/ सहठेकेदार किंवा प्रतिनिधी नेमल्याचे आढळून आल्यास सदरचा पुरवठा आदेश तत्काळ रद्द करुन पुरवठाधारकास काळया यादीत समाविष्ट करण्याची कारवाई करण्यात येईल.

३१. विवाद (Disputes) व कार्यक्षम (Jurisdiction) :- सदर चहा, नाश्ता व भोजन ठेका ई-निविदेबाबत निविदाधारक व विद्यापीठ यांच्यात कुठल्याही स्वरुपाचा वाद निर्माण झाल्यास मा. कुलगुरु यांनी दिलेला निर्णय हा अंतिम व दोन्ही वादी तथा प्रतिवादी पक्षांवर बंधनकारक राहील. निविदा मंजूरीअंती प्रचलित शासन नियमावलीनूसार मंजूर पुरवठाधारक यांचेशी निविदेतील अटी-शर्तींच्या अनुपालनास्तव करार करण्यात येईल. या करारनाम्यामुळे व करारनाम्याअंतर्गत कुठल्याही प्रकारचा वादविवाद उद्‌भवल्यास तो जळगाव जिल्हा सत्र न्यायालय यांच्या कार्यकक्षेतच दाखल करता येईल.

३२. ठेकेदारास **ऑक्टोंबर, २०१९ ते सप्टेंबर, २०२०** या कालावधीसाठीच चहा, नाश्ता व भोजनाचा ठेका चालविण्यास मिळेल. परंतु ठेकेदाराची सेवा विद्यापीठाच्या मते समाधानकारक असल्यास अधिकच्या कालावधीसाठी ठेका वाढवून देण्यात येईल. याबाबतचा अधिकार विद्यापीठाने आपल्याकडे राखून ठेवलेला आहे.

३३. ठेकेदारास उपरोक्त कामासाठी अथवा साहित्यापोटी अग्रीम रक्कम दिली जाणार नाही.

३४. ठेकेदाराने भरलेली निविदा विद्यापीठाने स्विकारल्यास त्याबाबत ठेकेदारास पत्रान्वये कळविण्यात येईल, तसेच कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा फेटाळण्याचा संपुर्ण अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेला आहे.

३५. ठेकेदाराने चहा, नाश्ता व भोजनासाठी आवश्यक सर्व वस्तु उच्च प्रतीच्या दर्जाच्या खरेदी कराव्यात. तसेच नाश्ता व भोजनासाठी शुध्द सोयाबीन तेल वापरावे.

३६. ठेकेदाराने पूरविलेले खाद्यपदार्थ भेसळयुक्त असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत ठेकेदार भेसळ प्रतिबंधक कायद्यामधील तरतूदीनुसार कारवाईस पात्र राहील.

३७. कार्यक्रमाच्या ठिकाणी व परिसरात कोणत्याही साहित्याची नासधूस, मोडतोड, चोरी, अपहार इत्यादी प्रकारे झालेले नुकसान ठेकेदाराला भरुन द्यावे लागेल.

३८. कार्यक्रमाच्या ठिकाणी किंवा परिसरात धुम्रपान, गुटखा, तंबाखुयुक्त पदार्थ, तसेच अल्कोहोलयुक्त पेय इत्यादींची विक्री किंवा सेवन करता येणार नाही.

३९. ठेकेदाराला कार्यक्रमाच्या बाहेर डबा देता येणार नाही.

४०. विद्यापीठाचे कर्मचारी / अधिकारी व प्राधिकरणांच्या कोणत्याही सदस्यास किंवा त्यांचे कुटूंबातील व्यक्तीस ठेका घेता येणार नाही.

ठेकेदाराची अनामत रक्कम ठेका संपल्यानंतर कार्यक्रम व्यवस्थापन कक्षाकडून ना देय प्रमाणपत्र सादर केल्या नंतरच परत करण्यात येईल.

**कुलसचिव,**
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

वरील सर्व अटी व शर्ती मी काळजीपूर्वक वाचून व समजून घेतल्या असून त्यांचे मी तंतोतंत पालन करीन.

स्थळ :

दिनांक : / / २०१९

**ई-निविदा धारकाचे नांव :**

**स्वाक्षरी :**

## प्रपत्र - १

### निविदाधारकाचा वार्षिक उलाढालीबाबत सनदी लेखापालाचा (Chartered Accountant) दाखला

प्रमाणित करण्यात येते की, ------------------------------------------------ यांच्या खाली नमूद केलेल्या बँकांच्या खात्यातील तपशील आणि वार्षिक ताळेबंद आमच्या मार्फत तपासण्यात आलेला असून, त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांची वार्षिक उलाढालीचा वर्षनिहाय तपशिल खालीलप्रमाणे आहे -

| **अ.क्र.** | **खातेदाराचे /निविदाकाराचे नांव** | **आर्थिक उलाढालीचे वर्ष** | **एकूण वार्षिक उलाढाल रक्कम** |
|---|---|---|---|
| | | सन 2018-19 | |
| | | सन 2017-18 | |
| | | सन 2016-17 | |

ठिकाण :

दिनांक : / /2019

**सनदी लेखापालाची**
**स्वाक्षरी व शिक्का व संपर्क क्रमांक**

टिप: या ठिकाणी निविदा भरणारे निविदाधारकाचे नांव अपेक्षीत आहे.

**प्रपत्र - 2**

## पूर्व अर्हता मुल्यांकन परिक्षण नमुना

1) निविदा ज्यासाठी भरावयाची आहे ते नांव :

2) निविदेचा क्रमांक :

3) निविदाकाराचे नांव व पत्ता :

| अ.क्र. | ज्या शासकीय /निमशासकीय संस्थेत भोजन ठेक्याचे काम केलेले आहे त्या संस्थेचे /कार्यालयाचे नांव व संपूर्ण पत्ता | पुराव्याकरीता पुरवठा आदेश व अनुभव दाखला जोडलेला आहेत काय ? होय / नाही |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

- सोबत पुराव्याचे पुरवठा आदेश व अनुभव दाखला स्वसांक्षांकित प्रतीत सादर करणे बंधनकारक आहे.

दिनांक : / /2019

निविदाकाराचे नांव :
व पत्ता :

मोबाईल क्रमांक :

## प्रपत्र - 3

### चहा, नाश्ता व भोजन पुरवठा निविदेकरीता निविदाधारकाने द्यावयाचे हमीपत्र

मी श्री /श्रीमती ------------------------------------------ पुर्व जाणीवतेने स्वखुशीने निविदा प्रक्रियेकामी विनाशर्त हमीपत्र लिहून देतो / देते की, या निविदा अर्जात नमुद केलेली माहिती माझे संपुर्ण माहितीनुसार खरी आहे. तसेच निविदा फार्म मधील नमुद सर्व अटीशर्ती हया मी स्वत: वाचल्या असून त्या मला मान्य आहेत व सदरच्या अटी-शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यास मी बांधील आहे. तसेच वित्तीय अनुपलब्धता अथवा इतर अपरिहार्य कारणामुळे चहा, नाश्ता व भोजन पुरवठा देण्याची रक्कम अदा करण्यास उशिर झाल्यास त्यावर व्याज दिले जाणार नाही हे मला मान्य असून सदर बाबत मला न्यायालयात दाद मागता येणार नाही. चहा, नाश्ता व भोजन पुरवठा अथवा तदनुषंगिक व्यावसायिक सेवा पुरवठयाबाबत शासनाच्या कोणत्याही विभागाने, कार्यालयाने किंवा शासनाच्या अधिकृत महामंडळ, सार्वजनिक उपक्रम व इतर शासकीय संस्था यांच्याव्दारे मला / आम्हाला सदर निविदा कालावधीकरीता बंदी/मनाई/ निलंबन आदेशान्वये काळया यादीत ( Black Listed) समाविष्ट केलेले नाही अथवा माझ्या / आमच्या विरुध्द न्यायालयीन प्रकरणी कायदेशीर कार्यवाही प्रस्तुत नाही.

ई-निविदा प्रक्रियेसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव येथील निविदा अनुपालनास्तव नमुद केलेल्या उपरोक्त सर्व अटी व शर्ती अ.क्र. **०१ ते ४१** हया मी / आम्ही प्रत्यक्ष वाचल्या असून मला / आम्हाला विनाशर्त मान्य आहेत. याबाबत माझी / आमची कोणतीही तक्रार नाही. आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची मी / आम्ही पुर्तता केली असून ते कागदपत्रे ई-निविदेसोबत जोडली आहेत. निविदा प्रक्रियेकामी आवश्यक कागदपत्र मी / आम्ही सादर केली नसल्यास मला / आम्हाला अपात्र ठरवून निविदा प्रक्रियेतुन वगळयाचा संपूर्ण अधिकार समितीस आहे याची मला / आम्हाला पूर्ण जाणीव आहे. सदर निविदा प्रक्रियेअंती माझी निविदा मंजुर झाल्यास वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत मी स्वखर्चाने रु.500/- च्या स्टॅम्प पेपरवर लेखी करारनामा करुन देण्यास मी विनाशर्त विनातक्रार तयार आहे.

तसेच निविदेच्या बाबतीत काही सूचना /आक्षेप / तक्रारी असल्यास व्यापारी लिफाफा उघडण्याच्या पुर्वी पर्यंत अशा सुचना / आक्षेप /तक्रारी या आपल्या कार्यालयाच्या registrar@nmu.ac.in या ई-मेल व्दारे सादर करण्याची देखील या व्दारे हमी देण्यात येत आहे.

मी / आम्ही ई-निविदेसाठी ऑनलाईन स्कॅन करुन सादर केलेले कागदपत्र /प्रमाणपत्र /अनुभवाचे दाखले आणि आर्थिक उलाढालीच्या संदर्भात दिलेले सनदी लेखापालाचे (Chartered Accountant) प्रमाणपत्र खरे व बरोबर आहेत. तसेच त्यातील नोंदविलेली माहिती ही निविदा प्रक्रियेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर प्राप्त आक्षेप / तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी अंती अंशत: अथवा पूर्णत: खोटी तथा निविदा प्रक्रियेतून अपात्र घोषित करण्याकामी संदिग्ध व अपुर्णता असलेल्या दस्तऐवजांचा समावेश असल्याचे आढळून आल्यास माझेवर / माझ्या संस्थेवर शासनाचे नियमानुसार उचित कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच माझी बयाणा रक्कम (EMD) जमा करण्यात येईल आणि मला / आम्हाला कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव च्या निविदा प्रक्रिये करीता काळया यादीत प्रविष्ट करण्यात येईल याची मला पुर्ण जाणीव आहे.

निविदेत सादर केलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे व नोंदविलेली माहिती ही सत्य व पूर्णत: खरी असून त्यात कोणताही फेरफार करण्यात आलेला नाही. निविदा दस्ताऐवजात अपूर्ण, संदिग्ध किंवा जाणीवपूर्वक गैरउद्देशाने खोटी माहिती नमूद केल्याचे आढळल्यास निविदा प्रक्रियेतुन अपात्र घोषित केले जाण्यास व त्याअन्वये उचित कायदेशीर कारवाईस मी पात्र राहील. तसेच माझी बयाणा रक्कम (EMD) जप्त करुन आमच्या संस्थेचा काळया यादीत (Black List) समाविष्ट करण्यात येईल, याची मला पूर्ण जाणीव असून मी / आम्ही कारवाईस पात्र राहील.

बालमजुरी, कामगार कायदे, लैंगिक पिळवणूक, मानवाधिकार, पर्यावरणाची हानी, शासनाची फसवणूक यासंदर्भातील प्रचलित कायद्यातील तरतूदींचे तसेच शासनाच्या नियमावलीचे आमच्याकडून काटेकोरपणे अनुपालन केले जात आहे. सदर बाबत माझ्यावर / आमच्यावर कुठल्याही स्वरुपाची फौजदारी अथवा शासन नियमावलीचे उल्लंघन प्रकरणी अन्य गंभीर स्वरुपाची कारवाई प्रस्तावित नाही किंवा न्यायप्रविष्ट नाही.

उपरोक्त प्रमाणे निविदेत मी पूर्णतः सत्य व अचूक माहिती नोंदविलेली असून निविदा अटी-शर्तीनूसार सर्व तरतूदी मला विनाशर्त विनातक्रार मान्य आहेत. त्यानुसार निविदेतील माहिती खोटी नोंदविल्याचे आढळल्यास निविदा अपात्र ठरण्यास व उचित कायदेशीर कारवाईस मी पात्र असेल, याची मला पूर्ण जाणीव आहे.

निविदाकाराचे नाव : ----------------------------------------

पत्ता व शिक्का : ----------------------------------------

----------------------------------------

स्वाक्षरी : ----------------------------------------

## प्रपत्र - 4

## निविदाधारकाराने दर मंजुरी संदर्भात द्यावयाचे संमतीपत्रक

नाव :
पत्ता :

दिनांक : / /2019

प्रति,
**मा.कुलसचिव,**
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव

**विषयः-** निविदा समिती मार्फत निश्चीत होणारे दर मान्य असल्या संदर्भात संमतीपत्रक

महोदय,

मी / आम्ही आपल्या मार्फत सन 2019-20 या वर्षात ई-निविदेव्दारे -------------------------------------- साठी प्रसिध्द झालेल्या निविदेत भाग घेतलेला असून समिती मार्फत ई-निविदा क्रमांक ____________ यास एक शहर एक दर या तत्वानुसार निश्चीत केलेले दर अथवा समितीने निश्चीत केलेले दर यास आमची संमती असून या संदर्भात कोणतीही हरकत नाही. निश्चीत केलेले दर मला / आम्हाला मान्य आहेत. करीता संमती पत्रक लिहून दिलेले आहे. त्या दराने मी / आम्ही चहा, नाश्ता व भोजन पुरवठा करण्यास तयार आहोत.

स्वाक्षरी : --------------------------------------

## प्रपत्र - 5

**पात्रतेविषयक ई-निविदेसोबत मुळ प्रति अपलोड करावयाच्या दस्तऐवजांची यादी (लिफाफा क्र.1 तांत्रिक निविदा)**

| तपशिल | कागदपत्रे सादर केली आहेत किंवा कसे ? होय / नाही |
|---|---|
| निविदाधारकाचे संपूर्ण नांव | |
| निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता | |
| दुरध्वनी क्रमांक | कार्यालय |
| | कंपनी |
| | मोबाईल क्रमांक |
| ई- मेल आय.डी. | |
| बयाणा रक्कम | |
| व्यवसाय कर निपटारा प्रमाणपत्र | |
| पॅन क्रमांक (PAN No.) | |
| वस्तु व सेवा कर अंतर्गत GST नोंदणी क्रमांक | |
| संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (दुकाने व संस्था अधिनियम 1948 अन्वये अथवा ग्रामपंचायत ) | |
| संस्था नोंदणी अधिनियम 1950 किंवा 1860 (बचत गट नोंदणी सक्षम प्राधिकारी प्रमाणपत्र सुट लागू असल्यास) | |
| Udyog Aadhaar चे नोंदणी प्रमाणपत्र (निविदा फॉर्म फी व बयाणा रकमेतून सुट लागू असल्यास) | |
| अन्न व औषध प्रशासन यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र | |
| सनदी लेखापालाचे उलाढाल संदर्भातील प्रमाणपत्र (प्रपत्र -1) | |
| संबंधित उत्पादकाचे प्राधिकार पत्र (लागू असल्यास) | |
| आयकर भरणा विवरणपत्र A.Y. 2019-20 | |
| संस्था / बचत गटाच्या नांवे असलेले बँक खात्याचे पास बुक प्रत जोडली आहे काय ? | |
| सरकारी /निमसरकारी/नामांकित खाजगी संस्थांमार्फत निर्गमित अनुभवाचे प्रमाणपत्र ( प्रपत्र - 2) | |
| अधिकृत प्रतिनिधीसाठीचे प्राधिकार पत्र (प्रपत्र - 6) | |
| निविदाकाराने प्रपत्र - 3 अन्वये सादर करावयाचे हमीपत्र | |
| दर मान्य असल्या संदर्भात संमतीपत्रक प्रपत्र ३ 4 | |
| **सदरचे प्रपत्र निविदा सोबत स्वाक्षरीने प्रमाणीत करुन सादर करणे बंधनकारक राहील.** | |

**टिप :** १) जोडलेल्या दस्तऐवजांसाठी (✓) अशी खुण करावी.

२) ठेकेदाराने या निविदेसोबत वरील कागदपत्रांच्या छायांकित सांक्षाकित प्रति जोडाव्यात.

३) या कागद पत्रांच्या मुळ प्रती निविदा उघडण्याच्या वेळी / तपासणीच्या वेळी विद्यापीठास उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

निविदाकाराची स्वाक्षरी / नांव व शिक्का

# <u>प्रपत्र - 6</u>

## (निविदाधारकाकडून प्राधिकृत प्रतिनिधीस निविदा कार्यवाहीस्तव दिलेले प्राधिकार पत्र)

दिनांक :    /    /2019

प्रति,

**मा. कुलसचिव,**
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव

विषय : चहा, नाश्ता व भोजन पुरवठा ई-निविदा कार्यवाहीस्तव निविदाधारक यांचे वतीने प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून प्राधिकार पत्र सादर करणेबाबत...

महोदय,

आम्ही ________________________________ आपल्या कार्यालयाचे स्तरावरील सन 2019-20 या शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमांकरिता राबविण्यात येणारी भोजन पुरवठा ई-निविदा क्रमांक ________ असे या निविदा कार्यवाहीकामी श्री./श्रीमती. ____________________________ यांना निविदा प्रक्रियेत भाग घेणे, निविदा कार्यवाही संबंधीच्या बैठकीस उपस्थित राहणे, निविदा दरात वाटाघाटी करुन संमती पत्र सादर करणे याकामी सर्वसंमतीने अधिकार प्रदान करुन सदर प्राधिकार पत्रान्वये निविदा कार्यवाहीस्तव प्राधिकृत करीत आहोत.

आपला विश्वासू,

| | |
|---|---|
| प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे नांव | निविदाकाराची नांव : |
| पत्ता : | पत्ता व शिक्का : |
| स्वाक्षरी : | स्वाक्षरी : |

(सूचना : प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीने निविदा कार्यवाहीदरम्यान विहीत नमुन्यातील मूळ प्राधिकारपत्र व स्वतःचे ओळखपत्र (पॅनकार्ड / मतदानकार्ड /बँक पासबुक /ड्राईविंग लायसन्स /जेष्ठ नागरिक कार्ड किंवा अन्य) दाखविणे अनिवार्य आहे.)

# शिफारस पत्र

दि.     /     /२०१९

श्री.______________________________ यांचा चहा, नाश्ता व भोजन पुरविणेचा परवाना (परमीट) क्र.____________हा असुन त्यांना मी स्वतः गेल्या ____ वर्षापासुन चांगल्या प्रकारे ओळखतो. त्यांनी चहा, नाश्ता व भोजनाचा पुरवठा करतांना चांगला दर्जा राखला असल्याची माझी अनुभवाअंती धारणा झाली आहे.

**आपला विश्वासु,**

( ________________________ )

**ओळख देणाऱ्याचे नाव :**

**व सही :**

- किमान दोन व्यक्तींचे शिफारस पत्र सादर करावे.

**विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमांसाठी एका वेळेस किमान ९० व कमाल २५०० व्यक्तींकरिता (आवश्यकते प्रमाणे) चहा, नाश्ता व भोजन मेनुचा तपशिल**

| अ.क्र. | प्रकार | | मेनु (यापैकी एक) |
|---|---|---|---|
| | **चहा/कॉफी/दूध/थंड पदार्थ व नाश्ता (शुध्द पाण्यासह-मीनरल वाटर)** | | |
| १ | चहा (प्रती कप दर) | | |
| २ | कॉफी (प्रती कप दर) | | |
| ३ | दुध (२०० ml प्रती व्यक्ती) | | |
| ४ | चहा / कॉफी बिस्किटांसह | | बिस्कीटे तीन ते चार प्रकारची (गुड-डे, पारले गोल्ड, मारी गोल्ड, मोनॅको, पारले २०-२०, पतंजली या प्रकारातील) |
| ५ | आईस्क्रिम/कुल्फी | | अमूल कंपनीचे |
| ६ | नाश्ता | १ | उपमा (बारीक शेव व लिंबूसह) |
| | | २ | साधे पोहे /रसा पोहे (बारीक शेव व लिंबूसह) |
| | | ३ | मिसळ + ०२ पाव (कांदा, लिंबू, कोथंबिरसह) |
| | | ४ | दही वडा |
| | | ५ | इडली सांबार /वडा सांबार, चटणीसह (दोन नग इडली किंवा वडा) |
| | | ६ | मसाला डोसा सांबार व चटणीसह |
| | | ७ | दाबेली (कांदा, लिंबू खटाईसह) |
| | | ८ | खमण (बारीक शेव व चटणीसह) - १०० ग्रॅम |
| | | ९ | समोसा + कचोरी (खटाई/सॉस व मिरचीसह) |
| | | १० | समोसा + कचोरी रगडा |
| | | ११ | रस्सा वडा (१५० ग्रॅम) (कांदा, लिंबू, कोथंबिरसह) |
| | | १२ | आलू वडा २ नग (२०० ग्रॅम) |
| | | १३ | दाल पकवान २ नग |
| | | १४ | मेथी पराठे व दही (०२ नग पराठे + १०० ग्रॅम दही नं.१) |
| | नाश्ता (उपवास) | १ | साबुदाणा खिचडी - १५० ग्रॅम व तळलेली हिरवी मिरचीसह |
| | | २ | उपवास चिवडा / नायलॉन साबुदाणा-शेंगदाणा - १०० ग्रॅम |
| | | ३ | वेफर्स (बटाटा/केळी) - ५० ग्रॅम |
| ७ | खेळाडूंसाठी | | ०२ केळी, ०२ अंडी व २०० ml दूध |
| ८ | फळ | | केळी/ सफरचंद /पपई/पेरु (Fruit Dish) |

| | **भोजन (शुध्द पाण्यासह-मीनरल वाटर)** | |
|---|---|---|
| १ | पातळ भाजी | आलु मटर/मटर पनीर मसाला/मटकी भाजी/शेव भाजी/छोले भाजी/दम आलू/पातोडी भाजी/चवळी भाजी/गट्टी मसाला/चना मसाला/पालक पनीर/सोयाबीन मसाला **अशा प्रकारातील कोणतीही एक भाजी** |
| २ | कोरडी भाजी | मसाले वांगे/भेंडी फ्राय/भेंडी मसाला/मिक्स भाजी/वाफलेले बटाटे/आलू कोबी मटर मिक्स/लसणी मेथी/गिलके भाजी/हिरवी मिरची भाजी/भरीत/दाल मेथी/गंगाफळ/सिमला मिरची(शेंगदाणासह) **अशा प्रकारातील कोणतीही एक भाजी** |
| ३ | भात | साधा भात/मसाले भात/पुलाव/काश्मिरी पुलाव/जीरा राईस **(सर्व बासमती तांदळात) अशा प्रकारातील कोणताही एक प्रकार** |
| ४ | दाळ | दाल फ्राय/दाल तडका/साधे वरण /तिखट वरण/दाल मखनी **अशा प्रकारातील कोणताही एक प्रकार** |
| ५ | पोळी/पुरी | पोळी / फुलके / साधी व मसाला पुरी - **सर्व आवश्यक** |
| ६ | गोड पदार्थ | काळा गुलाबजाम / गुलाबजाम / जिलेबी (साखर/गुळ) / मावा जिलेबी / साधा शिरा / मुगदाळ शिरा (गाईच्या तुपातील)/ मोहनथाळ/ दिलजानी / बालुशाही / इमारती / खोबरा बर्फी / मोतीपाक/मोतीचुर लाडु/ बुंदी/ गाजर हलवा/ श्रीखंड / आम्रखंड /आंब्याचा रस **यापैकी कोणताही एक प्रकार** |
| ७ | भजी | साधी भजी/कांदा भजी/मिरची भजी/मुग भजी/पालक भजी/बटाटा भजी **यापैकी एक** |
| ८ | पापड | नागली पापड/उडीद पापड/डिस्को पापड इ. **यापैकी एक** |
| ९ | सलाद | मीठ, लींबू, गाजर, बीट, टोमॅटो, काकडी, लोणचे **(सर्व प्रकार आवश्यक)** |
| १० | थंड पेय | मठ्ठा / कैरी पन्हे / ताक (आवश्यकतेप्रमाणे) **यापैकी एक** |

| | |
|---|---|
| | **खान्देशी मेनु भोजन (शुध्द पाण्यासह-मीनरल वाटर)** |
| १ | शेवभाजी, साधे वरण, भात, बाजरी भाकरी, फुलके व एक गोड पदार्थ, सलाद |
| २ | शेवभाजी, भरीत, साधी पुरी/कळणापुरी, फुलके व एक गोड पदार्थ, सलाद |
| ३ | साधे वरण/तिखट वरण, बट्टी (तळलेली), भात, वांग्याची घोटलेली भाजी, हिरवी मिरची भाजी (शेंगदाणासह), जिलेबी (साखरेची/गुळाची) सलाद व शुध्द विकास गाईचे तुप वरुन वाढण्यासाठी |
| ४ | कढी, खिचडी, कांदा, लिंबू व पापड |
| ५ | पिठलं (शेंगदाणा तेलासह), बाजरी/कळणा/दादर भाकरी, फुलके, मिरची ठेचा, साधा भात, सलाद |
| | **पावभाजी मेनु (शुध्द पाण्यासह-मीनरल वाटर)** |
| १ | पावभाजी, पापड व सलाद (कांदे, टमाटे, लिंबू, लाणचे इ.) (पावलादी अशोक बेकरी किंवा जीत बेकरीचे वापरावेत) |
| | **चायनीज मेनु (शुध्द पाण्यासह-मीनरल वाटर)** |
| १ | व्हेज मंन्चुरीयन ड्राय / ग्रेव्ही |
| २ | व्हेज हक्का नूडल्स / व्हेज शेजवान नूडल्स |
| ३ | पनीर चिल्ली / सोयाबीन चिल्ली मसाला |
| | **फुड पॅकेट (खाकी रंगाच्या पाकीटासह)** |
| १ | बटाटा (आलू) भाजी (कोरडी) १५० ग्रॅम व ०५ पुरी |
| २ | बटाटा (आलु) वडे २०० ग्रॅम पर्यंत (एकुण ०२ नग) |
| ३ | कचोरी + समोसा प्रत्येकी ०१ नग (एकुण ०२ नग) |
| | **उपवास मेनू (शुध्द पाण्यासह-मीनरल वाटर)** |
| १ | साबुदाणा खिचडी / साबुदाणा वडा, चटणी, दही, तळलेली हिरवी मिरची व लिंबू सह |

**टिप :** उपरोक्त मेनू प्रमाणे चहा, नाश्ता व भोजन तसेच चहा, नश्ता व भोजनात समाविष्ट केलेले पदार्थ न दिल्याचे आढळल्यास संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. बासमती तांदुळ, सुगंधी चिनोर, सोयाबीन तेल व चटणी व मसाले चांगल्या दर्जाची असावीत.

## हमीपत्र

मी / आम्ही जाहिर करतो की, आम्ही भोजन पुरवठाकामी हे दरपत्रक (BOQ) सादर करण्यापूर्वी उपरोक्त दरपत्रकामध्ये आम्ही नोंदविलेले दर ज्यावर आधारलेले आहेत, ते स्थानिक परिस्थितीनूसार अन्नधान्य - किराणा माल, दूध, फळे, भाजीपाला व इतर किरकोळ मालाचा खरेदी खर्च, वाहतूक, जकात, टोल, अन्य मंजुरी खर्च, आयकर, GST कर व इतर अनिवार्य कर असा एकूण खर्च याबाबत सद्यस्थिती बाजारभाव व संभाव्य महागाई याबाबत समग्र आढावा घेऊन तथा काळजीपूर्वक अभ्यास करुन नमूद आहारप्रणालीनूसार भोजन पुरवठाकामी सर्व संमतीने वरीलप्रमाणे प्रति व्यक्ती दर रुपये (सर्व करांसहित) चहा, नाश्ता व भोजन पुरवठयाचे दर विनाशर्त नोंदविलेले आहेत.

मी वरील प्रमाणे चहा, नाश्ता व भोजन मेनू देण्यास बांधिल असून नमुद मेनुनुसार चहा, नाश्ता व भोजन न पुरवल्यास देयकातून दंडात्मक रक्कम वसूल करण्यास माझी संमती असून कोणतीही हरकत राहणार नाही. वर नमुद केलेला प्रति व्यक्ती दर (सर्व करांसहित) चहा, नाश्ता व भोजनाचा दर मला मान्य व कबुल असून या दरास माझी संमती आहे. नोंदविलेल्या निविदा दरात कुठल्याही स्वरुपाची वाढ मिळण्याकामी माझा हक्क राहणार नाही तथा निविदा कार्यवाहीसंदर्भात शासनविरुध्द न्यायालयात तक्रार नोंदविणार नाही. सदर दरानुसार चहा, नाश्ता व भोजन पुरवठावेळी चहा, नाश्ता व भोजनाचे दर्जा-पुरवठाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास विद्यापीठ प्रशासन यांचा निर्णय अंतिम असून तो मला / आम्हाला बंधनकारक राहील व ते मला विनाशर्त मान्य आहे.

उक्त निविदेतील नमूद सर्व अटी-शर्ती ह्या मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला / आम्हाला विनाशर्ती मान्य आहेत. मी असे प्रमाणित करतो की. निविदेत नमूद दर इतर सस्था/विभाग/संघटनांना आकारण्यात आलेल्या दरापेक्षा जास्त नाहीत.

**ई निवीदा धारकाची स्वाक्षरी**

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमांसाठी चहा, नाश्ता व भोजनासाठी ई-निविदा सूचना

## (वर्ष २०१९-२०)

**कालावधी : ऑक्टोंबर, २०१९ ते सप्टेंबर, २०२०**

**संदर्भ**:- कबचौउमवि/२/का.व्य.क./ई-निविदा-१/६४/२०१९, दिनांक - १७/०९/२०१९

## लिफाफा क्रमांक - २ (व्यापारी लिफाफा) (BOQ)

१) ई -निविदाधारकाचे नाव व पत्ता : ____________________________________________

२) विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमांसाठी एका वेळेस किमान ९० व कमाल २५०० व्यक्तींकरिता (आवश्यकते प्रमाणे) चहा, नाश्ता व भोजन पुरविण्याचे (प्रति व्यक्ती प्रति दिवस) दर

( चहा, नाश्ता व भोजन पुरवठा ई-निविदा क्रमांक - कवचौउमवि/२/का.व्य.क./ई-निविदा १/६४/२०१९, दि. १७/०९/२०१९)

ठिकाण : 

ई-निविदाधारकाचे नाव : -----------------------------------

दिनांक: / /२०१९

पत्ता : -----------------------------------

-----------------------------------

स्वाक्षरी : -----------------------------------